05-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/4/2025 10:16 PM Page 1



## निवडक



हरमल : 'कथा कुणाची व्यथा कुणा' नाटकातील कलाकार व पदाधिकारी.

### हरमलात 'कथा कुणाची व्यथा कुणा' नाटकास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ४ :** मधलावाडा येथील श्री गावडेश्वर देवस्थानचा २० वा वर्धापनदिननिमित्त सादर केलेल्या 'कथा कुणाची व्यथा कुणा' नाटकास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या नाटकात अरुण गावडे, दीपक गावडे, प्रकाश गावडे, महादेव गावडे, संकेत गावडे, अमन गावडे, विष्णू गावडे, विघ्नेश गावडे, अजित मोरजकर, दीपाली गावडे व नमिता पिंगे यांच्या भूमिका होत्या व त्यांनी उत्कृष्ठ भूमिका साकारल्या.प्रारंभी देवस्थान समितीतर्फे धार्मिक विधी तसेच सुहासिनीचा दिवजोत्सव साजरा करण्यात आला.

### मांद्रे येथील देव कासार पुरुष देवस्थानचा आज वर्धापनदिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ४ :** मांद्रे बिद्रूबाग येथील श्री देव कासार पुरुष देवस्थानच्या १५ व्या वर्धापनदिन निमित्त सोमवार दि. ५ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.

यानिमित्त सकाळी ८ वा अभिषेक, १० वाजता श्री सत्यनारायण महापूजा, नंतर आरती, तीर्थ प्रसाद, दुपारी १ वाजता महाप्रसाद होईल. रात्री ८.४५ वाजता श्री शिवचीदंबर संस्कृतिक कला मंडळ डिंगने कुडणे ,धमाल विनोदी नाटक 'नेन्टी ती नेन्टी, जान्टी किदे कमी' होईल. या नाटकात प्रसाद नाईक,मालविका कारापुरकर, विनय मडकईकर, साईश मडकईकर,अंशू बेतकीकर,रतिकेश सोनशी कर,निजा राजपुत, अनिष्का गावडे यांच्या भूमिका आहेत.ह्या नाटकाचे लेखन ॲड. अभिलाषा नाईक, नेपथ्य ओप्तेश खांडेपारकर, आहेत. मंगळवार दि. ६ रोजी रात्री १० वा दशावतारी नाटक होणार आहे. तरी नाट्यरसिक व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कोनाडकर, शिरोडकर परिवार यांनी केले आहे.

### माजी सरपंच शाम हरमलकर यांना राष्ट्रीय पुरस्कार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. ४ :** इंटिग्रेटेड सोशल वेल्फेअर सोसायटी लिमिटेड व राष्ट्रीय ग्रामीण विकास फाउंडेशन बेळगावतर्फे दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. कर्नाटकाचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री वीरप्पा मोईली यांनी स्थापन केलेली ही संस्था असून यंदाचा पुरस्कार वितरण सोहळा रवींद्र भवन साखळी – गोवा येथे आज रविवार दिनांक २७ रोजी दुपारी १२ वा. होणार आहे. या पुरस्कार प्राप्त मान्यवरांत एक सामाजिक कार्यकर्ते, लाटंबार्से ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, शिरगाव येथील मे. राजाराम बांदेकर खाण कामगार पतसंस्था मर्यादित संस्थेचेही संस्थापक अध्यक्ष तथा अस्नोडा येथील पंचशील सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष शाम हरमलकर यांचा समावेश आहे. शाम हरमलकर यांना नुकताच सहकार क्षेत्रातील गोवा राज्यातील उत्कृष्ट सहकार अध्यक्ष म्हणून गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता.

### मांद्रे नववर्ष स्वागत समितीचा गौरव

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ४ :** यंदा गुढीपाडव्याच्या निमित्ताने मांद्रे नववर्ष स्वागत समितीने हिंदू नववर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक जल्लोषात केले होते.

श्री भगवती मंदिराच्या प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यात स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.समितीच्या कार्यकर्त्यांनी हिंदू संस्कृतीच्या जतनासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, श्री क्षेत्र तपोभूमी कुंडई येथे पद्मश्री विभूषित सद्‌गुरू ब्रह्मेशानंद स्वामींच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. स्वागताध्यक्ष मुकुंद कायसुकर, सचिव संजय नाईक, खजिनदार परेश सावंत, संपर्कप्रमुख विनायक च्यारी यांच्यासह रवी गोवेकर, ज्ञानेश्वर गावडे, सीताराम गावडे, दीपक म्हामल, संदेश शिरसाट आणि संयोजक महेश गोडकर यांचा सत्कार करण्यात आला.

या गौरवाने समितीच्या कार्याला नवचैतन्य प्राप्त झाले असून, भविष्यातही असेच कार्यक्रम आयोजित करून समाजात सांस्कृतिक जागरुकता निर्माण करण्याचा समितीचा मानस आहे.

# कोलकाताचा राजस्थानवर सनसनाटी विजय

## रियान आणि शिमरॉनची निर्णायक भागीदारी | राजस्थानचा १२ सामन्यांमधील नववा पराभव

**कोलकता, दि. ४ :**

कोलकाता नाईट रायडर्सने ईडन गार्डन्समध्ये राजस्थान रॉयल्सवर शेवटच्या बॉलवर १ धावाने सनसनाटी विजय मिळवला आहे. केकेआरने राजस्थानला विजयासाठी २०७ धावांचं आव्हान दिलं होतं. राजस्थानसाठी कर्णधार रियान पराग याने ९५ धावा केल्या. त्यामुळे राजस्थानला विजयासाठी शेवटच्या ओव्हरमध्ये २२ धावांची गरज होती. तेव्हा इमपॅक्ट प्लेअर शुभम दुबेने फटकेबाजी केली. त्यामुळे राजस्थानला विजयासाठी शेवटच्या बॉलवर ३ धावा हव्या होत्या. मात्र वैभव अरोरा याने अचूक बॉल टाकला. त्यामुळे राजस्थानच्या शुबम दुबे आणि जोफ्रा आर्चर या जोडीला १ धावच करता आली. जोफ्रा आर्चर दुसरी धाव घेताना नॉन स्ट्राईक एंडवर रन आऊट झाला. कोलकाताने अशाप्रकारे शेवटच्या बॉलवर १ धावेने विजय मिळवला. राजस्थानला २० ओव्हरमध्ये ८ विकेट्स गमावून २०५ धावांपर्यंतच पोहचता आले.

केकेआरसाठी राजस्थान विरुद्धचा हा करो या मरो असा सामना होता. केकेआरने शेवटच्या चेंडूवर यश मिळवले. केकेआरने यासह ११ व्या सामन्यात पाचवा विजय मिळवला आणि प्लेऑफमधील आव्हान कायम राखले. तर राजस्थानचा हा १२ सामन्यांमधील नववा पराभव ठरला. राजस्थानचे प्लेऑफमधील आव्हान याआधीच संपुष्टात आलं आहे.



कोलकाताने २०७ धावांचा पाठलाग करायला आलेल्या राजस्थानला झटपट ५ झटके दिले. वैभव सूर्यवंशी ४ आणि यशस्वी जयस्वाल याने ३४ धावा केल्या. तर कुणाल सिंह राठोर, ध्रुव जुरेल आणि वानिंदु हसरंगा या तिघांना भोपळाही फोडता आला नाही. त्यामुळे राजस्थानची ७.५ ओव्हरमध्ये ५ आऊट ७१ अशी बिकट स्थिती झाली. त्यानंतर रियान पराग आणि शिमरॉन हेटमायर या दोघांनी सहाव्या विकेटसाठी निर्णायक भागीदारी केली. त्यामुळे राजस्थान सामन्यात कायम राहिली.

रियान आणि शिमरॉन या दोघांनी सहाव्या विकेटसाठी ९२ रन्सची पार्टनरशीप केली. त्यानंतर शिमरॉन हेटमायर २३ बॉलमध्ये २९ रन्स करुन आऊट झाला. त्यानंतर निर्णायक क्षणी रियान परागही आऊट झाला. रियानने ४५ बॉलमध्ये ८ सिक्स आणि ६ फोरसह ९५ रन्स केल्या. रियान आऊट झाल्याने राजस्थान बॅकफुटवर गेली आणि केकेआरने सामन्यात कमबॅक केले.

रियान आऊट झाल्यानंतर इम्पॅक्ट प्लेअर शुबम दुबे आणि जोफ्रा आर्चर या जोडीने राजस्थानला शेवटपर्यंत सामन्यात कायम ठेवलं. आता राजस्थानला २० व्या ओव्हरमध्ये २२ धावांची गरज होती. राजस्थानने पहिल्या २ चेंडूत ३ धावा केल्या. त्यानंतर शुबमने तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या बॉलवर अनुक्रमे ६,४ आणि ६ ठोकत सामन्याची रंगत वाढवली. आता राजस्थान विजयासाठी शेवटच्या बॉलवर अवघ्या ३ धावांची गरज होती. शुबम फटके मारत असल्याने राजस्थानला विजयाची आशा होती. तर बॉलवर वैभव दबावात होता. मात्र वैभवने यॉर्कर टाकत अवघी १ धाव करुन दिली. दुसऱ्या धावेच्या प्रयत्नात जोफ्रा आर्चर रन आऊट झाला. केकेआरने अशाप्रकारे १ रनने विजय मिळवला.

# अजिंक्य रहाणेच्या निशाण्यावर ख्रिस गेलचा विक्रम

**कोलकता, दि. ४ :**

गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स आयपीएल २०२५ च्या ५३ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सशी सामना करण्यासाठी सज्ज आहे. हा सामना कोलकात्यातील ईडन गार्डन्सवर खेळला जाणार आहे, ज्यामध्ये यजमान केकेआरचे ध्येय राजस्थानला हरवून प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा जिवंत ठेवणे असेल. या सामन्यात केकेआरला त्यांचा कर्णधार अजिंक्य रहाणेकडूनही मोठ्या अपेक्षा असतील, जो या हंगामात ३०० धावा करण्याच्या अगदी जवळ आहे. त्याने या हंगामात १० सामन्यांपैकी ९ डावांमध्ये सुमारे १५० च्या स्ट्राईक रेटने २९७ धावा केल्या आहेत. आता अजिंक्य रहाणे राजस्थानविरुद्ध फलंदाजीने मोठी कामगिरी करू शकतो. जेणेकरून संघ प्लेऑफच्या शर्यतीत टिकू शकेल. या दरम्यान, त्याच्या लक्ष्यावर एक खास विक्रम असेल.



खरं तर, आयपीएलमध्ये अजिंक्य रहाणेने १९५ सामन्यांपैकी १८० डावांमध्ये ४९३९ धावा केल्या आहेत. जर रहाणेने राजस्थानविरुद्ध ६१ धावा केल्या तर तो आयपीएलमध्ये त्याचे ५००० धावा पूर्ण करेल. तसेच, आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत तो ख्रिस गेल आणि रॉबिन उथप्पाला मागे टाकेल. आयपीएलमध्ये ५००० धावांचा मोठा आकडा गाठणारा तो नववा फलंदाज असेल. आतापर्यंत आयपीएलमध्ये फक्त ८ फलंदाजांना ही खास कामगिरी करता आली आहे. यामध्ये विराट कोहली, रोहित शर्मा, शिखर धवन, डेव्हिड वॉर्नर, सुरेश रैना, एमएस धोनी, एबी डिव्हिलियर्स आणि केएल राहुल यांचा समावेश आहे.

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली, केकेआरने आतापर्यंत १० पैकी फक्त ४ सामने जिंकले आहेत तर ५ सामने गमावले आहेत. तर पावसामुळे एक सामना अनिर्णीत राहिला. पॉइंट टेबलमध्ये, केकेआर सध्या ९ गुणांसह ७ व्या स्थानावर आहे तर राजस्थान रॉयल्स संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.

### आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारे फलंदाज

- विराट कोहली – ८५०९
- रोहित शर्मा – ६९२१
- शिखर धवन – ६७६९
- डेव्हिड वॉर्नर – ६५६५
- सुरेश रैना – ५५२८
- एमएस धोनी – ५४०६
- एबी डिव्हिलियर्स – ५१६२
- केएल राहुल – ५०५४
- ख्रिस गेल – ४९६५
- रॉबिन उथप्पा – ४९५२
- अजिंक्य रहाणे – ४९३९

# आयुष म्हात्रेने रचला इतिहास

**बंगळुरू, दि. ४ :**

चेन्नई सुपर किंग्जचा सलामीवीर आयुष म्हात्रेने आरसीबीविरुद्ध मोठी कामगिरी केला आहे. आयपीएलमध्ये तो पहिले शतक झळकावू शकला नाही, पण या दरम्यान त्याने इतिहास रचला. आयुष म्हात्रे चेन्नईसाठी अर्धशतक झळकावणारा सर्वात तरुण फलंदाज ठरला. त्याने केवळ १७ वर्षे २९१ दिवसांच्या वयात ही कामगिरी केली. याशिवाय, आयुष आयपीएलमध्ये अर्धशतक झळकावणारा तिसरा युवा फलंदाज ठरला आहे. त्याच्या पुढे रियान पराग आणि वैभव सूर्यवंशी आहेत.

आयपीएलमध्ये सर्वात कमी वयात अर्धशतक झळकावणाऱ्यांमध्ये वैभव सूर्यवंशी आघाडीवर आहे. त्याने या हंगामात १४ वर्षे ३२ दिवसांच्या वयात गुजरात टायटन्सविरुद्ध अर्धशतक झळकावून विक्रम केला. यापूर्वी हा विक्रम रियान परागच्या नावावर होता, ज्याने २०१९ मध्ये १७ वर्षे १७५ दिवसांच्या वयात दिल्ली



कॅपिटल्सविरुद्ध अर्धशतक झळकावले होते. आता आयुष १७ वर्षे २९१ दिवसांच्या वयात अर्धशतक करणारा तिसरा युवा खेळाडू ठरला आहे. याशिवाय, २०१३ मध्ये संजू सॅमसनने १८ वर्षे १६९ दिवसांच्या वयात आरसीबीविरुद्ध अर्धशतक झळकावले होते.

या यादीत पृथ्वी शॉचे नावही समाविष्ट आहे. पृथ्वीने २०१८ मध्ये केकेआरविरुद्ध दिल्ली संघाकडून खेळताना १८ वर्षे १६९ दिवसांच्या वयात हा पराक्रम केला होता. आतापर्यंत चेन्नईसाठी अर्धशतक झळकावणारा सर्वात युवा फलंदाज सुरेश रैना होता. सुरेश रैनाने २००८ मध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध हा पराक्रम केला होता.

# व्हायकाउंट ऑफ पेडणे हायस्कूलमध्ये भित्तिपत्रक स्पर्धा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. ४ :** पाणी हे जीवन आहे म्हणून जीवनासाठी ते अत्यंत आवश्यक आहे. मानव, प्राणी आणि वनस्पती हा विचार केला तर एकूणच पृथ्वीवरील सर्व जीवधारी हे पाण्यावर अवलंबून आहेत. पाण्याशिवाय जीवन आपण कल्पनाच करू शकत नाही. शुद्ध पाणी हे पिण्यासाठी, शेती–भातीसाठी, उद्योग धंद्यासाठी, एकंदरच काय तर दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी अत्यावश्यक आहे. पाणी या भूमीवर विविध रूपात अस्तित्वात आहे. जसे की, समुद्रात, नद्या नाल्यात, तलावात, विहिरीत, साठवलेल्या धरणात तर राहिलेले भूमिगत स्थितीत ते आढळते.




पेडणे : चित्रासोबत विद्यार्थी.

आज जलस्तोत्रांच्या वाढत्या वापरामुळे, पाण्याच्या होणाऱ्या दुरुपयोगामुळे, दूषित पाण्यामुळे पाणीटंचाई ही अत्यंत गंभीर समस्या येऊन उभी ठाकली आहे. यासाठी पाणी संवर्धन होणे काळाची गरज आहे. शाळा शिक्षा आणि साक्षरता मिशन, शिक्षा मंत्रालय भारत सरकार यांनी आयोजित जल पखवाडा या अंतर्गत ७व्या दिवशी व्हायकाऊंट ऑफ पेडणे हायस्कूल पेडणे येथे ६ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी भीतीपत्रक स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला व आपल्या कल्पकतेने पाण्याचे महत्व चित्रातून स्पष्ट केले.

सदर स्पर्धा शाळेचे चित्रकला शिक्षक श्री राजमोहन शेटये यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. स्पर्धेत उत्कृष्ट अशी पाच चित्रे निवडण्यात आली. त्यात हर्षिता देसाई (६वी ) प्रथम, रिहान परब (६वी) द्वितीय, कविता सावंत (७ वी) तृतीय, तर सायनी आपुले व रेषा मांजरेकर अनुक्रमे यांना उत्तेजनार्थ बक्षिसे प्राप्त झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीप्तेज गाड, कृष्णा कांबळी व विक्रांत नाईक यांनी सहकार्य केले. स्पर्धा संयोजक म्हणून कलाशिक्षक राजमोहन शेट्ये यांनी काम पाहिले.

# आरसीबीने चेन्नईला २ धावांनी नमवले

## आरसीबीने प्लेऑफमधील स्थान पक्के | बेथेल आणि विराटची ९७ धावांची भागीदागी

**बंगळुरू, दि. ४ :**

आयपीएल २०२५ स्पर्धतील ५२व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने चेन्नई सुपर किंग्सचा धावांनी धुव्वा उडवला. या सामन्यात आरसीबीने विजयासाठी २१३ धावांचे आव्हान दिले होते. पण आव्हान काही चेन्नई सुपर किंग्सला काही गाठता आले नाही. या विजयासह आरसीबीने प्लेऑफमधील स्थान पक्के केले आहे.

आयपीएल २०२५ स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने जबरदस्त कामगिरी केली. नाणेफेकीचा कौल गमावल्यानंतर वाटेला प्रथम फलंदाजी आली. मात्र आरसीबीकडून सलामीला आलेल्या जेकॉब बेथेल आणि विराट कोहली यांनी चांगली सुरुवात करून दिली. पहिल्या विकेटसाठी या दोघांनी ९७ धावांची भागीदारी केली. जेकॉब ५५ धावा, तर विराट कोहली ६२ धावा करून बाद झाला. हे दोन खेळाडू बाद झाल्यानंतर धावांची गती मात्र मंदावली. देवदत्त पडिक्कल आणि



रजत पाटिदार काही खास करू शकले नाहीत. त्यामुळे धावा १७० च्या आसपास होतील असे वाटले होते. पण रोमारियो शेफर्ड नावाचे वादळ मैदानात घोंघावलं. त्याने समोर येईल त्याला धुतला. अवघ्या १४ चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकार मारून अर्धशतक पूर्ण केले. त्याच्या खेळीमुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने ५ गडी गमवून २१३ धावांपर्यंत मजल मारली. तसेच विजयासाठी २१४ धावांचं आव्हान दिलं. हे आव्हान काही चेन्नई सुपर किंग्सला गाठता आले नाही. चेन्नई सुपर किंग्सने २० षटकात ५ गडी गमवून २११ धावा केल्या. आयुष म्हात्रेने ९४ धावांची खेळी केली पण ती व्यर्थ गेली. आयपीएल इतिहासात पहिल्यांदाच आरसीबीने एकाच पर्वात दोनदा चेन्नई सुपर किंग्सला नमवले.

शेवटच्या षटकात चेन्नई सुपर किंग्सला विजयासाठी १५ धावांची गरज होती. पहिल्या चेंडूचा सामना करण्यासाठी धोनी स्ट्राईकला होता. त्याने एक धाव काढली आणि रवींद्र जडेजाला स्ट्राईक दिली. दुसऱ्या चेंडूवर रवींद्र जडेजान एक धाव घेतली. तिसऱ्या चेंडूवर स्ट्राईकला असलेला धोनी पायचीत झाला. त्यानंतर शिवम दुबे फलंदाजीला आला आणि चौथ्या चेंडूवर त्याने षटकार मारला. पण हा चेंडू कंबरेच्या वर असल्याने दुबेने रिव्ह्यू घेतला. पंचांनी नो बॉल दिला. त्यामुळे तीन चेंडूत सहा धावांची गरज होती. त्यानंतर एक धाव आली. दोन चेंडूत पाच धावांची गरज आणि समोर रवींद्र जडेजा स्ट्राईकला होता. पुन्हा एक धाव आली. शेवटच्या षटकात ४ धावांची गरज होती. स्ट्राईकला दुबे होता. शेवटच्या चेंडूवर १ धाव आली आणि आरसीबीने हा सामना २ धावांनी जिंकला.

चेन्नई सुपर किंग्स आणि राजस्थान रॉयल्स हे दोन संघ स्पर्धेतून आऊट आहेत. पण प्लेऑफमधील स्थान पक्के करणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हा पहिला संघ ठरला आहे. कारण प्लेऑफमधील जागा पक्की करण्यासाठी १६ गुण आवश्यक आहे. जर तर झाले तरी चौथ्या स्थानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु हा संघ कायम राहणारे हे पक्के आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुची आता टॉप २ मध्ये राहण्याची शर्यत सुरु झाली आहे. आता पुढच्या सामन्यात कशी कामगिरी होते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दरम्यान, १८व्या पर्वात आरसीबी जेतेपद मिळवेल का? याकडे चाहत्यांचा नजरा लागून आहेत.

# काणकोणात 'गीत रामायण' मैफल रंगतदार !

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**काणकोण, दि. ४ :** पैगींण – काणकोण येथील श्री परशुराम मंदिरात परशुराम जयंतीनिमित्त येथील परशुराम पंचैग्राम मंदिर समिती, माहिती व प्रसिद्धी आणि पर्यटन खाते गोवा सरकार यांच्या सहकार्याने, दीपा क्रिएशन्स प्रस्तुत व त्रिमुर्ती रसिक मित्र निर्मित महाराष्ट्र वाल्मिकी आधुनिक महाकवी ग. दि. माडगूळकर यांच्या लेखणीतून साकारलेले व स्वरगंधर्व सुधीर फडके (बाबूजी) यांनी संगीतबद्ध केलेले मराठी संस्कृतीचा अनमोल ठेवा गीत रामायण काल रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने अधिकच रंगतदार ठरले.

प्रथितयश गायक प्रवीणनाईक व गायिका अंतरामोघे यांनीमिळून गीत रामायणातील २१ गाणी खुपच छान गायली.स्वयें श्रीराम प्रभू ऐकती....! सरयू तीरावरी अयोध्या...! उगा का काळीज माझे उले...! दशरथा घे हे पायसदान...! राम जन्मला गं सखी...! सावळा गं रामचंद्र...! जेष्ठ तुझा पुत्र मला...!चला राघवा चला...! स्वयंवर झाले सीतेचे...!मोडू नका वाचनास नाथा...!नकोस नौके परत फिरु...! माता न तूं वैरिणी....! दैवजात दु:खें भरता...! मज आणुन द्या तो हरिण अयोध्यानाथा....!असा हा एकची श्रीहनुमान....! नको करुंस वल्गना रावणा निशाचरा...! पेटवी लंका हनुमंत....! सेतू बांधा रे सागरी...! भूवरी रावण वध झाला....! त्रिवार जयजयकार रामा.....! गा बाळांनो श्रीरामायण....! अशा एकापेक्षा एक गीतांनी अक्षरश:राम भक्ती जागवली.



या मैफलीचे अतिशय प्रभावी संगीत संयोजन बाळकृष्ण मेस्त (कीबोर्ड), रोहित बांदोडकर (तबला) अश्विन जाधव (ऑक्टोपॅड), प्रदीप पंडित (निवेदक) रुद्रेश फोंडेकर (ध्वनी संकल्पना) यांनी साथसंगत केली. गेली तीन वर्षे पर्यटन मंत्री रोहन खवंटे व माननीय गोवाराज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या पाठिंब्याने श्री भगवान परशुराम जयंती उत्साहात होते. त्यात सागर अग्नी साहेबांचे शिस्तबद्ध आयोजन सर्व भाविक रसिक प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेते. वसंत पूजा आणि विविध फळांचे वाटप करुन उत्सवाची सांगता करण्यात आली. मंदिर समितीतर्फे सर्व कलाकारांना सन्मानित करण्यात आले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 242 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .